| | | |
|---|---|---|
| MHPU07-005546-2025 | दाखल दिनांक | १७/०७/२०२५ |
| | नोंदणी दिनांक | १७/०७/२०२५ |
| | निकाल दिनांक | ०२/०७/२०२६ |
| | कालावधी | **००व, ११म, १५दि.** |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, लोहमार्ग न्यायालय, पुणे**
**यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी एन.जे.चव्हाण)**

**नि.फौ.खटला क्र. १०३/२०२५** **निशाणी क्र. २७**

**(न्यायनिर्णयाचे शिर्षक पान)**
**नमुना क्र. ३२**

**भाग 'अ'**
**[ परिच्छेद ४४(i) भाग ६ फौजदारी नियमावली ]**

| | |
|---|---|
| तक्रार तपशील | भारत सरकार मार्फत श्री. संतोष जाधव, प्रधान आरक्षक रेसुब, पुणे यांच्या दाखल तक्रारीवरुन गु.क्र. २४८४/२०२५ **कलम १४३** रेल्वे अधिनीयम, १९८९ नुसार. |
| तक्रारदार | **भारत सरकार**<br>तर्फे<br>श्री. संतोष जाधव, रेसुब, पुणे. |
| सरकारी अभियोक्ता | श्री. गौरव सिंग, विद्वान सरकारी अभियोक्ता, मध्य रेल्वे, पुणे मंडळ. |
| आरोपी | **तारीफ रहमान शेख**<br>वय – ३४ वर्ष, व्यवसाय – मजुर,<br>रा.- उरुळी देवाची, पुणे. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | विद्वान अधिवक्ता श्री. एस. एफ. घुगे |

**भाग – ब**
**[ परिच्छेद ४४(ii) भाग ६ फौजदारी नियमावली ]**

| | |
|---|---|
| घटनेची तारीख | ०१/०५/२०२५ |
| तक्रारची तारीख | ०१/०५/२०२५ |
| तक्रार पत्र दाखल तारीख | १७/०७/२०२५ |

| | |
|---|---|
| आरोप ठेवल्याची तारीख | ०८/०८/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०८/०८/२०२५ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची तारीख | - |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०२/०७/२०२६ |
| शिक्षा आदेशाची तारीख, असेल तर | ०२/०७/२०२६ |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप | दोषी किंवा निर्दोषी | लादलेली शिक्षा | खटल्यादरम्यान अटकेचा कालावधी कलम ४६८ भा.ना.सु.सं. नुसार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **तारीफ रहमान शेख** | आरोपीस फौ.प्र.सं. कलम ४१ प्रमाणे नोटीस देण्यात आली. | १७/०७/२०२५ | रेल्वे अधिनियम चे **कलम १४३** | दोषी | **६,०००/-** रु. दंड, दंड न भरल्यास **१२ दिवस** साधा कारावास भोगावा. | निरंक |

## भाग – क

## अभियोगपक्ष, बचावपक्ष व न्यायालयीन साक्षीदारांची यादी

## [ परिच्छेद ४४(iii) भाग ६ फौजदारी नियमावली ]

| क्रमांक | नाव | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| अभियोगपक्ष सा.क्र.१ | संतोष सिदू जाधव | १ | फिर्यादी |

## अभियोगपक्ष, बचावपक्ष व न्यायालयाचे निशाणी

| अनु.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ९ ते १२ | ई-तिकीटे |
| २. | १३ | जप्ती पंचनामा |
| ३. | १४ | तक्रार |

## जप्त मुद्देमालाचे वर्णन:

| अनु.क्र. | मुद्देमालचा क्रमांक | मुद्देमालाचे वर्णन |
|---|---|---|
| १. | - | ४ नग पुढील यात्रेचे ई -तिकीट |
| २. | - | ०१ जुना रेडमी कंपनीचा मोबाईल |

## न्या य नि र्ण य
## (दिनांक ०२/०७/२०२६ रोजी अधिघोषित)

आरोपीविरुद्ध रेल्वे सुरक्षा बल, पुणे (यापुढे सोईकरिता रे.सु.ब., पुणे असे संबोधण्यात येईल) यांचेतर्फे रेल्वे अधिनियम १९८९ चे कलम १४३ नुसार तक्रार दाखल करण्यात आलेली आहे.

### सरकारपक्षातर्फे घटनेची संक्षिप्त हकीकत अशी आहे की,

२. फिर्यादी संतोष जाधव हे दिनांक ०१/०५/२०२५ रोजी हेड कॉन्स्टेबल म्हणुन आरपीएफ पुणे येथे कार्यरत असताना त्यांना सायबर सेल पुणे यांचेकडुन गुप्त माहिती मिळाली होती की, उरूळी देवाची या ठिकाणी रेल्वे तिकीटांचा अवैध व्यवसाय सुरू आहे. त्यानुसार निरीक्षक, आरपीएफ पुणे यांच्या आदेशान्वये ते व संतोष जायभाये उरूळी देवाची येथे गेले व तेथे गेल्यावर गोडावुनमध्ये एक व्यक्ती ए. सी. डक्टचे काम करत होता. त्याच्याकडे अधिकची विचारणा केली असता त्याने त्याचे नाव तारीफ रहमान शेख असे सागुन तो लोकांकडुन ५०/- ते १००/- रूपये जास्तीचे घेवुन लोकांना रेल्वे तिकीटे काढुन देतो. त्यांची तपासणी केली असता त्यांच्याकडे **नि. क्र. ९ ते १२** वरील पुढील प्रवासाची ४ ई-तिकीटे आढळुन आली. सदरची तिकीटे पंचांसमक्ष त्यांनी **नि.क्र.१३** वरील जप्ती पंचनाम्यानुसार जप्त केली.

३. त्यानंतर फिर्यादीने आरोपीविरुध्द तक्रार दिली. फिर्यादीच्या तक्रारीनुसार आरोपीविरुध्द गुन्हा क्र. २४८४/२०२५ रेल्वे अधिनियम १९८९ चे कलम १४३ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला. प्रस्तुतच्या प्रकरणाची चौकशी संतोष जायभाये, सहा. उप-निरीक्षक रेसुब, पुणे यांनी करुन साक्षीदारांचे जबाब नोंदवले व कागदपत्रे हस्तगत केली. आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने त्याच्याविरुध्द रेल्वे अधिनियम १९८९ चे कलम १४३ नुसार न्यायालयात तक्रारपत्र दाखल केले.

४. तक्रार दाखल झालेनंतर आरोपी न्यायालयासमक्ष हजर झाला. सरकारपक्षाने

साक्षीदार क्र.१ संतोष सिदु जाधव - फिर्यादी यांना आरोपीवर दोषारोप ठेवण्यापूर्वी तपासले. त्यानुसार आरोपीस गुन्ह्याबाबत विचारले असता त्याने गुन्हा कबुल नसल्याचे प्रतिकथन केले व त्याच्यावर फौजदारी संपरिक्षा चालविण्याची विनंती केली. त्यानुसार आरोपीविरुध्द दोषारोप **निशाणी क्र. १५** वर ठेवला. त्यातील मजकूर त्याला त्याच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगितला. त्याने गुन्हा नाकबुल असल्याचे कथन करुन त्याचे निवेदन **नि.क्र. १६** खाली न्यायालयात सादर केले.

५. आरोपीने रेसुब कर्मचा-या समक्ष दिलेला त्याचा कबुली जबाब **नि.क्र. २२** मान्य करुन त्यास कमीत कमी द्रव्यदंडाची शिक्षा द्यावी अशी विनंती केली आहे. विद्वान सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंतीनुसार अभियोगपक्षाचा पुरावा दि. २३/०९/२०२५ रोजी बंद करण्यात आला. अभिलेखावर आलेल्या तोंडी व कागदोपत्री पुराव्यानुसार, भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम ३५१ प्रमाणे आरोपीचे निवेदन दि. १५/०५/२०२६ रोजी **निशाणी क्र. २६** वर नोंदविण्यात आले. आरोपीचा बचाव हा त्यास चुकीच्या केसमध्ये गोवण्यात आल्याचा आहे.

६. सरकारपक्षाने सादर केलेले साक्षी पुरावे, विद्वान सरकारी अभियोक्ता व आरोपीचे विद्वान अधिवक्ता यांचे आज रोजी केलेल्या युक्तीवादावरुन खटल्याचे अंतीम निकालाचे अनुषंगाने निम्नलिखीत मुद्दे विचाराधीन उद्भवतात. खालील नमुद केलेल्या कारणांवरुन त्यांचे निघत असलेले निष्कर्ष त्या मुद्दयांसमोर नोंदविलेले आहेत -

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले का की, दि. ०१/०५/२०२५ रोजी १२.१० वाजता ए.आर. इंटरप्रायजेस, उरुळी देवाची, सासवड-कात्रज रोड, पुणे येथे आरोपी हा रेल्वे तिकीटांची बेकायदेशीर व विनापरवाना खरेदी व विक्री करीत असताना मिळून आला व अशा प्रकारे रेल्वे अधिनियम, १९८९ चे **कलम १४३** नुसार गुन्हा केल्याचे सरकारपक्षाने सिद्ध केले काय ? | होय. |
| २. | अंतीम आदेश काय ? | आरोपीस दोषी ठरविण्यात येते. |

## <u>कारणमिमांसा</u>

७. सरकारपक्षाने आरोपीविरुद्ध दोषारोप सिध्द करण्याकरिता साक्षीदार क्र.१ श्री. श्री. संतोष सिदु जाधव यांना **निशाणी क्र. १** वर तपासले आहे. त्यांनी त्यांचे तोंडी पुराव्यामध्ये **नि.क्र. ९ ते १२** वरील ४ ई-तिकीटे, **नि.क्र. १३** वरील जप्ती पंचनामा व **नि.क्र. १४** वरील तक्रार सिध्द केलेली आहे. प्रकरणाच्या दरम्यान आरोपीने **२२** वरील स्वतःचा कबुली जबाब मान्य केले असल्याने सरकारपक्षामार्फत स्वतंत्र पंच साक्षीदारांना तपासण्यात आलेले नाही. वरीष्ठ सरकारी अभियोक्ता श्री. गौरव कुमार सिंग यांच्या तोंडी विनंतीनुसार अभियोगपक्षाचा पुरावा नि.क्र. १ खाली आदेश पारीत करुन दि. २३/०९/२०२५ रोजी बंद करण्यात आला.

### <u>मुद्दा क्र.१ करीता -</u>

८. सरकारपक्षाने आरोपीविरुध्द रेल्वे अधिनियम, १९८९ चे **कलम १४३** नुसार तक्रार दाखल केली आहे. सबब, या ठिकाणी रेल्वे अधिनियम, १९८९ चे कलम १४३ पुर्नोरुत्पादीत करणे गरजेचे आहे -

**कलम १४३- (१)** कोणताही व्यक्ती, जो रेल्वे सेवक किंवा या बाबतीत अधिकृत एजंट नाही -

**(अ)** रेल्वेवर प्रवास करण्यासाठी किंवा ट्रेनमधील प्रवासासाठी आरक्षित जागेसाठी तिकिटे मिळवणे आणि पुरवणे याचा व्यवसाय चालवतो; किंवा

**(ब)** स्वतः किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या माध्यमातून कोणताही असा व्यवसाय चालवण्याच्या उद्देशाने तिकिटे खरेदी किंवा विक्री करतो किंवा खरेदी किंवा विक्री करण्याचा प्रयत्न करतो, तर त्याला तीन वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा किंवा दहा हजार रुपयांपर्यंत दंड, किंवा दोन्ही, आणि त्याने मिळवलेली, पुरवलेली, खरेदी केलेली, विकलेली किंवा खरेदी किंवा विक्री करण्याचा प्रयत्न केलेली तिकिटे जप्त केली जातील.

तथापि, न्यायालयाच्या निर्णयात विशेष आणि पुरेसे कारण नसल्यास, अशा शिक्षेची किमान मुदत एक महिन्यापर्यंतचा कारावास किंवा पाच हजार रुपयांचा दंड असावा.

**(२)** जो कोणी या कलमानुसार शिक्षापात्र गुन्ह्याला साहाय्य करतो, तो गुन्हा झाला किंवा नाही, त्याला त्या गुन्ह्यासाठी दिलेली तीच शिक्षा दिली जाईल.

९. प्रस्तुतच्या प्रकरणात आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता सरकारपक्षाला सर्वप्रथम हे सिद्ध करणे गरजेचे आहे की, दि. ०१/०५/२०२५ रोजी १२.१० वाजता ए.आर. इंटरप्रायजेस, उरुळी देवाची, सासवड-कात्रज रोड, पुणे येथे आरोपी हा रेल्वे तिकीटांची बेकायदेशीर व विनापरवाना खरेदी व विक्री करीत असताना मिळून आला. त्याकरीता सरकारपक्षाने साक्षीदार क्र.१ श्री. संतोष सिदू जाधव यांना **निशाणी क्र.१** वर तपासले. त्यांनी त्यांचे साक्षीपुराव्यात असे कथन केले की, दिनांक ०१/०५/२०२५ रोजी ते हेड कॉन्स्टेबल म्हणुन आरपीएफ पुणे येथे कार्यरत होते. त्यांना सायबर सेल पुणे यांचेकडुन गुप्त माहिती मिळाली होती की, उरूळी देवाची या ठिकाणी रेल्वे तिकीटांचा अवैध व्यवसाय सुरू आहे. त्यानुसार निरीक्षक आरपीएफ पुणे यांच्या आदेशान्वये ते व संतोष जायभाये उरूळी देवाची येथे गेले व तेथे गेल्यावर गोडावुन मध्ये एक व्यक्ती ए. सी. डक्टचे काम करत होता. त्यांना अधिकची विचारणा केली असता त्याने सांगितले की, लोकांकडुन ५०/- ते १००/- रू. जास्तीचे घेवुन लोकांना रेल्वे तिकीटे काढुन देतो. त्याने त्याचे नाव तारीफ रहमान शेख असे सांगितले. त्यांची तपासणी केली असता त्यांच्याकडे **नि. क्र. ९ ते १२** वरील पुढील प्रवासाची ४ ई तिकीटे आढळुन आली. सदरची तिकीटे पंचांसमक्ष त्यांनी जप्त केली. तिकीट जप्त केल्यानंतर पंचांसमक्ष **नि.क्र.१३** वरील जप्ती पंचनामा करण्यात आला. त्यानंतर त्यांनी आरोपीविरूध्द **नि. क्र. १४** वरील लेखी फिर्याद दिली.

१०. साक्षीदाराने उलटतपासात कथन केले की, आरोपीबाबत त्यांना कोणाचीही तक्रार प्राप्त नसल्याचे कथन त्यांनी नाकारले. घटनास्थळी प्रवाशांनी त्यांच्यासमक्ष आरोपीस जास्तीचे पैसे देवुन तिकीटे घेतली नाहीत. आरोपीचे स्वतःचे दुकान अथवा तिकीटांचा व्यवसाय नसल्याचे कथन त्यांनी मान्य केले. त्यांनी जप्त केलेल्या तिकीटांचे प्रवासी कोण होते व कोठुन कोठे जात होते याबद्दल त्यांना माहिती नाही. फक्त संशयावरून त्यांनी आरोपीविरूध्द फिर्याद दिल्याचे कथन नाकारले.

११. तक्रारदारातर्फे अभिलेखावर देण्यात आलेल्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, आरोपी हा आयआरसीटीसी मार्फत अधिकृत एजंट नाही. त्याच्याकडे रेल्वेची तिकीटे खरेदी व विक्री करण्याचा कुठलाही परवाना नाही. प्रस्तुतच्या प्रकरणात जी तिकीटे जप्त करण्यात आली आहेत ती रेल्वेची तिकीटे असल्याची बाब अविवादीत आहे. आरोपीने सदरची तिकीटे त्याच्याकडे कुठलाही परवाना नसताना व्यवसायीक नफा मिळवण्यासाठी विक्री केल्याचे अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरुन दिसुन येत आहे. प्रस्तुतच्या

प्रकरणातील तथ्ये विचारात घेतली असता या ठिकाणी मा. सर्वोच्च न्यायालयाचे **एन्सपेक्टर, रेल्वे प्रोटेक्शन फोर्स विरुध्द मॅथ्यु के. चेरीयन २०२५ आयएनएससी ५१** या प्रकरणातील न्यायनिर्णयाचा आधार घेणे गरजेचे ठरते. मा. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात असे नमुद केले की, प्रस्तुतचा गुन्हा घडण्याकरीता ई-तिकीट व कागदी तिकीट यात कुठलाही फरक नाही. प्रस्तुतचे कलम ऑनलाईन मिळणा-या ई-तिकीटांनाही लागु होते. एखादी व्यक्ती व्यावसायीक फायद्यासाठी बनावट आय.डी तयार करुन तिकीटांचा व्यापार करत असेल तर तो फौजदारी गुन्हा ठरतो असे देखील मा.सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने हे देखील आदेशीत केले की, अधिकृत आयआरसीटीसी एजंटने वैयक्तीक आय.डी वापरुन ते तिकीट काढल्यास तो आयआरसीटीसीच्या नियमांचा भंग ठरतो, परंतु कोणत्याही परवान्याशिवाय रेल्वे तिकीटांचा काळाबाजार करणा-या दलालांवर रेल्वे अधिनीयम १९८९ चे कलम १४३ नुसार फौजदारी गुन्हा दाखल होवु शकतो.

१२. प्रस्तुतच्या प्रकरणात आरोपी हा आयआरसीटीसीचा अधिकृत एजंट नाही. तसेच त्याच्याकडे तिकीटे खरेदी-विक्री करण्याचा कुठलाही तात्पुरता परवाना देखील नाही. आरोपीने स्वतः **नि.क्र. १३** वरील जप्ती पंचनामा व **नि.क्र. २२** वरील स्वतःचा कबुली जबाब इत्यादी दस्तऐवज मान्य केलेले आहेत. सदरील कबुली जबाब हा सिध्द केलेला असल्यामुळे सरकारपक्षामार्फत इतर पंच साक्षीदार तपासण्यात आलेले नाहीत. प्रस्तुतच्या प्रकरणातील साक्षीदार हे फिर्यादी असुन त्यांनी सरकारपक्षाच्या कथनास त्यांच्या तोंडी पुराव्यातुन दुजोरा दिलेला आहे. त्यांनी आरोपी हा दि. ०१/०५/२०२५ रोजी १२.१० वाजता ए.आर. इंटरप्रायजेस, उरुळी देवाची, सासवड-कात्रज रोड, पुणे येथे रेल्वे तिकीटांची बेकायदेशीर व विनापरवाना खरेदी व विक्री करीत असताना मिळून आला असल्याचे कथन केलेले आहे. आरोपीच्या ताब्यातुन ४ नग पुढील यात्रेचे ई -तिकीट व १ रेडमी कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. **नि.क्र. १४** वरील तक्रार ही अभियोगपक्षाने साक्षीदार क्र. १ च्या तोंडी पुराव्यातुन सिध्द केलेले आहेत. आरोपीने सदरची तक्रार खोटी व बनावट आहे हे सिध्द होण्या इतपत कुठलाही पुरावा अथवा साक्षीदाराच्या पुराव्यातील कमतरता उलटतपासात अभिलेखावर आणलेल्या नाहीत.

१३. मा. सर्वोच्च न्यायालय यांनी **''बालकिशन ए. देवीदयाल वि. महाराष्ट्र शासन व इतर १९८१ एससीआर (१) १७५''** या प्रकरणामध्ये निर्देशीत केलेले आहे की, रे.सु.बल कर्मचारी हा

पोलीस नसल्याने, आरोपीने रे.सु.बल कर्मचाऱ्यांना दिलेले त्याचे बयान आरोपीविरुद्ध वाचता येते. आरोपीने **नि.क्र. २२** वरील त्याचा जबाब स्वतः मान्य केल्यामुळे भारतीय साक्ष अधिनीयमाच्या **कलम ५३** नुसार सदर कबुली जबाब शाबीत झाला असुन आरोपीविरुध्द विचारात घेण्यात आलेला आहे. सरकारपक्षा मार्फत देण्यात आलेला तोंडी व कागदोपत्री पुराव्यावरुन हे सिध्द होते की, दि. ०१/०५/२०२५ रोजी १२.१० वाजता ए.आर. इंटरप्रायजेस, उरुळी देवाची, सासवड-कात्रज रोड, पुणे येथे आरोपी हा रेल्वे तिकीटांची बेकायदेशीर व विनापरवाना खरेदी व विक्री करीत होता. सबब, आरोपी हा रेल्वे अधिनीयम, १९८९ च्या **कलम १४३** प्रमाणे दोषी असल्याचे सिध्द होत आहे. वरील कारणांवरुन, मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवतो.

**मुद्दा क्र.२ करीता -**

१४. आरोपीविरुध्द रेल्वे अधिनीयम, १९८९ च्या **कलम १४३** प्रमाणे दोषारोप सिध्द झाल्याने आरोपी हा सदरील कलमांअंतर्गत नमुद शिक्षेस पात्र ठरतो. सबब, आरोपीला त्याच्याविरुद्ध प्रस्तुतचा गुन्हा शाबीत झाल्याचे सांगण्यात आले व शिक्षेबाबत त्याला विचारण्याकरीता याठिकाणी थांबण्यात आले आहे.

पुणे.
दि. ०२/०७/२०२६

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.07.02 17:15:47 +0530

**(एन. जे. चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.

१५. आरोपीने त्याच्या बचावात कथन केले की, त्यांच्याकडून चुकीने सदरचा गुन्हा घडलेला आहे. तसेच तो गरीब आहे व त्याचे घरामध्ये एकटेच कमावता आहे. त्याचेवर त्याच्या कुटूंबाची जबाबदारी आहे. यापुढे त्यांच्याकडून असा कोणताही गुन्हा होणार नाही. त्यामुळे त्यांना कमीत कमी शिक्षा करण्यात यावी, अशी त्यांनी विनंती केली. आरोपीच्या विद्वान वकीलांनी देखील त्याचप्रमाणे युक्तीवाद केला.

१६. सरकारपक्षातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, आरोपीचा सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा आहे. त्याच्या कृत्यामुळे प्रवाशांची फसवणुक झालेली आहे. त्यामुळे त्यास सदर गुन्ह्यात जास्तीत जास्त शिक्षा करण्यात यावी.

१७. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. आरोपीने केलेले कथन विचारात घेतले. त्यानुसार

असे दिसुन येते की, आरोपीवर त्याच्या कुटूंबाची जबाबदारी आहे व तो गरीब आहे, परंतु या कारणांवरुन त्यांनी केलेल्या गुन्ह्याचे स्वरुप बदलत नाही. आरोपीच्या ताब्यातुन ४ नग पुढील यात्रेचे ई -तिकीट व १ रेडमी कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आलेले आहेत. आरोपीने केलेल्या कथनावरुन त्याला त्याने केलेल्या गुन्ह्याचे स्वरुप कळले असून त्यांना त्यांच्या कृत्याचा पश्चाताप होत असल्याचे दिसून येत आहे. आरोपीने रेल्वेची तसेच प्रवाशांची फसवणुक केलेली आहे. त्याच्या या कृत्यामुळे प्रवाशांना नाहक त्रास तसेच अडचणीला सामोरे जावे लागले आहे. परंतु, आरोपीचा न्यायालयासमक्ष व्यवहार, त्याच्यावर असलेली त्याच्या कुटूंबाची जबाबदारी, त्यांची आर्थिक परिस्थिती आणि त्यांना झालेला पश्चाताप व त्यांच्या एकंदर परिस्थितीचा विचार करता पुढीलप्रमाणे द्रव्यदंडाची शिक्षा देणे न्यायाचे उद्देश गाठण्याकरिता पुरेशी होईल. सबब, मुद्दा क्र. २ करीता मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करतो -

| आ दे श | |
|---|---|
| १. | आरोपी **तारीफ रहमान शेख** यांना रेल्वे अधिनियम, १९८९ चे **कलम १४३** नुसार भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम **२७१(२)** प्रमाणे दोषी ठरविण्यात येते. |
| २. | आरोपीस सदरील अपराधाकरीता **रक्कम रु ६०००/-** द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावण्यात येते. सदरील दंड आरोपीने न भरल्यास त्यास **१२ दिवस** साध्या कारावासाची शिक्षा देण्यात येते. |
| ३. | आरोपीने त्यांचे जामीनपत्र व बंधपत्र जमा करावे. |
| ४. | प्रकरणातील जप्त मुद्देमाल ताब्यातुन **४ नग पुढील यात्रेचे तिकीटे** रेल्वे अधिनियम, १९८९ चे **कलम १४३(१)(ब)** नुसार अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावे. |
| ५. | सुपूर्तनाम्यावर देण्यात आलेला जप्त मुद्देमाल १ नग रेडमी कंपनीचा मोबाईलचा ताबा नियमानुसार अपील कालावधीनंतर मुळ मालकाकडे कायम करण्यात येतो. |
| ६. | सदर न्यायनिर्णयाची प्रत आरोपीस विनामुल्य देण्यात यावी. |

***( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित )***

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.07.02 17:15:39 +0530

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.

पुणे.
दि. ०२/०७/२०२६

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी शपथेवर सांगतो की, पी.डी.एफ. न्यायनिर्णयामधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराप्रमाणे शब्द-न-शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | आर.आर.क्षिरसागर<br>लघुलेखक (श्रेणी III) |
| न्यायालयाचे नाव | - | एन.जे.चव्हाण<br>न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग<br>लोहमार्ग न्यायालय, पुणे. |
| न्यायनिर्णयाची तारीख | - | ०२/०७/२०२६ |
| पिठासीन अधिकाऱ्याने न्यायनिर्णयावर६<br>सही केल्याची तारीख | - | ०२/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | - | ०२/०७/२०२६ |